**सन २०१६-१७ करीता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत अनुदान अंतर्गत Establishment of Innovative concept of Science Centers at secondary & Higher secondary Ashram Schools या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१७/प्र.क्र.८४/का-१९**
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: ०१/०१/२०१८

**संदर्भ-**

१. आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०१६/प्र.क्र.६४/का-१९, दि.३०/०३/२०१७
२. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे पत्र क्र. भासंअनु-२०१७/प्र.क्र.१६/का.८(४), दि.०४/०८/२०१७

**प्रस्तावना -**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता केंद्र शासनाने Establishment of Innovative concept of Science Centres at secondary & Higher secondary Ashram Schools या योजनेस मान्यता प्रदान करून सदर योजनेकरीता एकुण रु. ४००.०० लक्ष निधी वितरीत केला आहे. सदर निधी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना संदर्भ क्र. १ वरील शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आलेला आहे आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सुचना आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी संदर्भ क्र. २ वरील पत्रान्वये मान्यतेसाठी सादर केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-**

या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ नुसार Establishment of Innovative concept of Science Centers at secondary & Higher secondary Ashram Schools योजनेच्या एकुण रु ४००.०० लक्ष किंमतीच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

सदर मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी कार्यवाही करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०२१११८१११२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2018.01.02 11:23:19 +05'30'

(अ.रा.राजपूत)
कक्ष अधिकारी

**प्रत,**

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. स्वीय सहायक,मा. सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५. सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे
८. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
९. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१०. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

**परिशिष्ठ क्र.१**

**भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सन २०१६-१७ करीता**

<table>
<tr><td>१</td><td>योजनेचे नांव</td><td>Establishment of Innovative concept of Science Centers at secondary & Higher secondary Ashram Schools (unit cost Rs.१६ Lakhs)</td></tr>
<tr><td>२</td><td>योजनेतील युनिट/ लाभार्थी संख्या</td><td>सोबतच्या प्रपत्राप्रमाणे
<table>
<tr><td>अ.क्र.</td><td>प्रकल्प कार्यालय</td><td>आश्रमशाळांची संख्या</td><td>शेरा</td></tr>
<tr><td>१</td><td>डहाणू</td><td>५</td><td rowspan="6">शाळांची निवड करण्याचे अधिकार प्र.अ. यांना राहतील. शाळेमध्ये उपलब्ध साधन सामुग्री व जागेनुसार प्र.अ. यांनी शाळांची निवड करावी.</td></tr>
<tr><td>२</td><td>जव्हार</td><td>५</td></tr>
<tr><td>३</td><td>शहापूर</td><td>५</td></tr>
<tr><td>४</td><td>पेण</td><td>५</td></tr>
<tr><td>५</td><td>घोडेगाव</td><td>४</td></tr>
<tr><td>६</td><td>सोलापूर</td><td>१</td></tr>
<tr><td></td><td>एकुण</td><td>२५</td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>३</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>सदर विज्ञान केंद्र उभारणीसाठी अपर आयुक्त, ठाणे कार्यक्षेत्रतील प्रकल्प अधिकारी, यांच्या कार्यक्षेत्रात साधारणत: ५ शाळामागे १ विज्ञान केंद्र उभारणी करिता ज्या आश्रमशाळेत कमीत कमी १२०० ते १५०० स्क्वेअर फुट ( तिन वर्ग खोल्या) एवढया जागेची उपलब्धता होईल अशा शाळा</td></tr>
<tr><td>४</td><td>योजनेसाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक</td><td>अंदाजे प्रति युनिट रुपये १६.०० लक्ष एकुण २५ युनिट साठी रु.४००.०० लक्ष</td></tr>
<tr><td>५</td><td>योजना राबविणारी यंत्रणा</td><td>संबधीत आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व संस्था</td></tr>
<tr><td>६</td><td>नियंत्रण अधिकारी</td><td>संबधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प</td></tr>
<tr><td>७</td><td>योजनेचा उद्देश/हेतु</td><td>१.विज्ञानाच्या ज्या संकल्पाना इ.१० वी पर्यंतही समजत नाहीत त्या सदरील सेंटर मध्ये एका दिवसात स्पष्ट होतात. शाळेत विज्ञान केवळ कागदावर शिकविले जाते. त्यातील मुळ विज्ञान व संकल्पना शिक्षक आणि विद्यार्थ्यांना स्पष्ट होण्यासाठी त्या पध्दतीने प्रयोग सदरील संस्थेत करता येतात. त्याच बरोबर अनेक प्रश्न सोडविण्याच्या गणिताच्या व भुमितीच्या विविध पध्दती विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत व सप्रयोगासह शिकावयास मिळतात तसेच विद्यार्थ्यांची वैचारिक पातळी वाढण्यास मदत होते. त्यामुळे या सेंन्टरचे महत्व आहे.<br>२.वरील बाबीचा विचार करुन ज्या शाळेत कमीत कमी १२०० ते १५०० स्क्वेअर फुट (तिन वर्ग खोल्या) एवढया जागेची उपलब्धता होईल अशा शाळेच्या ठिकाणी परिसरालगत असलेल्या ५ आश्रमशाळेमागे एक विज्ञान केंद्र उभारणी बाबत प्रस्ताव सादर केले असता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर योजना ही प्रथम टप्प्यात नाशिक अपर आयुक्त, अंतर्गत प्रकल्पामधील आश्रम शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर प्रभावी पणे अमंलबजाणी केलेली आहे.<br>३.सामाजिक व आर्थिक विकास संस्था केरवाडी ता.पालम जि.परभणी या संस्थेने सन २०१३-१४ मध्ये भारतीय संविधानाच्या अुनच्छेद २७५(१) मध्ये मंजुर रक्कम रु.७०.०० लक्ष मध्ये या पुर्वी ०५ व राज्य योजनेतुन २७ असे एकुण ३२ विज्ञान केंद्राची निवीदा</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | पध्दतीने यशस्वी उभारणी केलेली आहे. त्याचप्रमाणे या योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.<br>४) त्यानुसार सदर योजना विद्यार्थ्यासाठी लाभदाई ठरल्यामुळे व प्रकल्प अधिकारी, यांच्याकडुन सदर योजनेस उत्तम प्रतिसाद प्राप्त झाल्याने पुनश्च: उर्वरित अपर आयुक्त कार्यालयाच्या क्षेत्रातील प्रकल्प अधिकारी, यांच्या अधिनिस्त असलेल्या शाळेमध्ये राबविण्यात यावी. |
| ८ | योजना अंमलबजावणी कार्यपध्दती | आयुक्तालयाच्या स्तरावरुन सदर योजनेची कार्यवाही खालील प्रमाणे करण्यात येईल.<br>१. संबधित प्रकल्प अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रमशाळांचे सर्वेक्षण करुन सायन्स सेंन्टर उभारणीसाठी वरिल तपशिलाप्रमाणे पात्र शासकीय आश्रमशाळेची निवड करतील.<br>२. सन २०१४-१५ कालावधीमध्ये अपर आयुक्त, नाशिक यांचे अंतर्गत ज्या प्रमाणे विज्ञान केंद्रांची निर्मिती केली त्याच प्रकारे या २५ विज्ञान केंद्राची निर्मिती करावी.<br>३. विज्ञान केंद्र हा नाविन्यपुर्ण उपक्रम असून ह्या एका केंद्रामध्ये अनेक बाबींचा समावेश आहे. सदर केंद्रामध्ये प्रशिक्षण, प्रदर्शन, प्रत्यक्ष प्रयोग यासारख्या बाबींचा समावेश असल्याने त्याच्याकडे एक वस्तूम्हणून न पाहता एक उपक्रम म्हणून पाहणे आवश्यक आहे. सबब, विज्ञान केंद्राची निर्मिती जेमप्रणालीद्वारे न करता संस्थेची निवड इ-टेंडरींगद्वारे आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी करावी.<br>४. विज्ञान केंद्र निर्माण करण्यासाठी विज्ञान केंद्रामध्ये आवश्यक वस्तूंचे प्रारूप आयुक्त, आदिवासी विकास यांनी निश्चित करावे, त्या प्रारुपासह व प्रशिक्षण व प्रदर्शनाच्या प्रक्रीयेसह विज्ञान केंद्र उभारण्यासाठी ई टेंडरींग अथवा अभिस्वारस्य प्रस्तावाद्वारे संस्थांचे प्रस्ताव मागवून घेवून संस्था निवडीची प्रक्रीया पार पाडावी.<br>५. सदरची विज्ञान केंद्रे निर्मिती करताना निविदा प्रक्रीयेमध्ये / अभिस्वारस्यामध्ये कमीत कमी किंमत याबाबीस महत्व न देता ज्या प्रारूपाचे विज्ञान केंद्र निर्माण करावयाचे आहे त्या बाबतचा संबधित संस्थेचा अनुभव, साहीत्याचा दर्जा यांना महत्व द्यावे. जेणेकरून अधिक चांगल्या व दर्जेदार प्रकारच्या विज्ञान केंद्रांची निर्मिती होवू शकेल.<br>६. निश्चित केलेल्या आर्थिक मर्यादेत विज्ञान केंद्राच्या प्रारूपाप्रमाणे साहीत्याचा पुरवठा करण्याची, प्रदर्शन भरविण्याची व प्रशिक्षणाची जबाबदारी संबधित संस्थेची राहील.<br>७. पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्याआधी सदर विज्ञान केंद्रांची निर्मिती करण्यात येईल याची दखल आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी घ्यावी.<br>८. विज्ञान केंद्रांची निर्मीती करण्यासाठी प्रक्रीयेमध्ये आवश्यक बदल करण्याचे सर्वस्वी अधिकार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना राहतील. |
| ९ | निधी वितरणाची कार्यपध्दती | १) संबधित संस्थेने प्रारुपा नुसार व स्पेसिफिकेशन नुसार तसेच सुस्थितीत साहित्याचा पुरवठा केल्यानंतर ७० टक्के रककम अनुज्ञेय राहील.<br>२) सायन्स सेंन्टरची उभारणी केल्यानंतर २० टक्के रक्कम देय राहील.<br>३) सायन्स सेंटरीची उभारणी करुन साहित्याच्या वापाराबाबतचे शाळेतील विषय शिक्षकास प्रशिक्षण दिल्या नंतर उर्वरित १० टक्के रक्कम देय राहिल. |
| १० | योजनेच्या अटी व शर्ती | १. खरेदी केलेले साहित्य (Establishment of Innovative concept of Science Centers at secondary & Higher secondary Ashram Schools.) निवड केलेल्या शासकीय आश्रम शाळाना थेट पुरवठा करण्याची जबाबदारी संबधित संस्थेची असुन यंत्र |

| | | |
|---|---|---|
| | | आस्थापीत करुन वापरण्याबाबतचे दोन दिवसाचे प्रशिक्षण संबधीत विज्ञान व इतर शिक्षकांना देणे बंधनकारक राहील.<br>२. साहित्याचा पुरवठा पुर्ण झाल्यानंतर Installation अहवाल शासकीय आश्रम शाळेतील मुख्याधपक यांचे कडुन प्रकल्प अधिकारी यांचे मार्फत व अपर आयुक्त यांच्याकडुन तपासणी करुन सयंत्र लाभदाई ठरल्यानंतर यंत्रणेची मंजुर रक्कम अदा करण्यात येईल,या व्यतीरिक्त जादा रक्कम अदा करता येणार नाही.<br>४. पुरवठा झालेल्या साहित्याची (Establishment of Innovative concept of Science Centers at secondary & Higher secondary Ashram Schools) नोंद आश्रम शाळेतील जडसंग्रह नोंदवही मध्ये घेण्यात यावी.<br>५. आश्रम शाळेत प्राप्त झालेले साहित्य (Establishment of Innovative concept of Science Centers at secondary & Higher secondary Ashram Schools) संबधीत आश्रम शाळेच्या मुख्यध्यापक/विज्ञान शिक्षक यांच्या नियंत्रणाखाली राहिल.<br>६. योजना राबविल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत प्रपत्रात सादर करावे.<br>७. पुरवठा करावयाचे साहित्याची. (Establishment of Innovative concept of Science Centers at secondary & Higher secondary Ashram Schools.) तांत्रीक दृष्ट्या व स्पेशिफिकेशन प्रमाणे योग्य असल्याबाबत प्रमाणपत्र शिक्षण संस्था/ तत्सम संस्था यांचेकडुन तपासणी करुन देणे संबधीत संस्थेस बंधनकारक राहील.<br>८. सदर योजनेअंतर्गत जेवढे अनुदान मंजुर करण्यात आले आहे. त्याच मर्यादेत योजना पुर्ण करणे बंधनकारक राहील. कोणत्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान मंजुर केले जाणार नाही.<br>९. योजना अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीत तसेच योजनेच्या अटी-शर्ती व लक्षांकात बदल/ लक्षांक वर्ग करण्याचे अधिकार आयुक्त आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना राहील.<br>१०. सदर योजनेचा मासिक/त्रैमासिक प्रगती अहवाल व खर्च अहवाल तसेच खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र अपर आयुक्त व आयुक्त, यांनी आदिवासी विकास यांना सादर करणे बंधनकारक राहील.<br>११. योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहिती आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची जबाबदारी संबंधीत अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची संयुक्तरित्या राहील. |
| ११ | योजनेची फलनिष्पत्ती | १ शासकीय आश्रमशाळामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना या सायन्स सेंटरचा चांगल्या प्रकारे लाभ होईल तसेच विद्यार्थी स्वत: प्रयोग करायला शिकतील, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक साहित्यांशी जवळून परिचय होईल, ज्यायोगे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल व अभ्यासाव्यतिरिक्त बाहेरचे ज्ञान मिळण्यास सदर सेंन्टरचा उपयोग होईल.<br>२. सदर योजनेमुळे स्थानिक तसेच इतर शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या विज्ञानाच्या संदर्भातील संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल.<br>३. सदर सायन्स सेंन्टरमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची कक्षा रुंदावण्यास मदत होईल.<br>४. सदरच्या सायन्स सेंन्टरमुळे विद्यार्थ्यांना नवनवीन शोधांची माहिती मिळेल व विद्यार्थ्यांची संशोधकवृत्ती जोपासण्यास मदत होईल. |